आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२३ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ६२ पूर्णांक २० शतांश टक्के मतदानाची नोंद / सहाव्या टप्प्यातला प्रचार थंडावला
- बुद्धपौर्णिमेनिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
- डोंबिवली इथं रसायनांच्या कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू, तर किमान ५६ जण जखमी / दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश / मृतांच्या नाटवाईकांना पाच लाखांची मदत
- छत्तीसगडमध्ये सात माओवादी ठार

  **आणि**
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने ओलांडला ७५ हजारांचा टप्पा

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीसाठी २० मे रोजी झालेल्या पाचव्या टप्प्यातल्या मतदानात एकूण ६२ पूर्णांक २० शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. यापैकी सुमारे ६१ पूर्णांक ४८ शतांश टक्के पुरुष मतदार, ६३ टक्के महिला मतदार तर २१ पूर्णांक ९६ शतांश टक्के तृतीयपंथी मतदार होते. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार सर्वाधिक महिला मतदारांची नोंद पश्चिम बंगालमध्ये ७८ पूर्णांक ४३ शतांश टक्के इतकी झाली असून त्या पाठोपाठ ओदिशामध्ये ७४ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

महाराष्ट्रात सर्वात कमी म्हणजे ५५ पूर्णांक ३२ शतांश टक्के महिलांनी मतदान केल्याची नोंद झाली असून जम्मू आणि काश्मीरमध्ये ५५ पूर्णांक ६३ टक्के महिलांनी मतदान केल्याची नोंद आहे. पाचव्या टप्प्यात एकूण ६९५ उमेदवार

निवडणूक रिंगणात होते. या टप्प्यात उत्तर प्रदेशात १४, महाराष्ट्रात १३, पश्चिम बंगालात ७, ओदिशा आणि बिहारमध्ये प्रत्येकी ५, झारखंड मध्ये ३ तर जम्मू काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशात प्रत्येकी एका जागेसाठी मतदान झालं.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातला प्रचार आज संपला. या टप्प्यात उत्तर प्रदेशातल्या १४, हरयाणातल्या १०, हिमाचल प्रदेशातल्या ४, बिहारमधे आणि उत्तराखंडमधे प्रत्येकी ८, तसचं ओदिशातल्या ६ अशा एकूण ५७ मतदारसंघांमध्ये येत्या शनिवारी मतदान होणार आहे. याखेरीज जम्मू काश्मीरमध्येही अनंतनाग-राजौरी मतदारसंघात शिल्लक राहिलेलं मतदान शनिवारी होणार आहे. या ५८ जागांसाठी ८९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आजच्या शेवटच्या दिवशी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच पक्षांनी निकराचा प्रयत्न केला.

**<><><><>**

सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात देशातल्या ५७ मतदारसंघांमधे येत्या एक जूनला मतदान होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघाचा त्यात समावेश आहे. या टप्प्यातल्या प्रचारालाही जोर आला असून विविध नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत.

**<><><><>**

इंडीया आघाडी देशाऐवजी आपल्या परिवाराला प्राधान्य देत असल्याची टीका प्रधानमंत्री आणि भाजपाचे जेष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी हरियाणामधल्या महेंद्रगड इथल्या प्रचार सभेत बोलताना केली. इंडीया आघाडीला निवडणुकीच्या

आजवर झालेल्या ५ टप्प्यात अपयश आलं असून त्यामुळे हताश झालेला विरोधीपक्ष मतदान यंत्र आणि निवडणूक आयोगानं दिलेल्या माहिती संदर्भात बिन बुडाचे आरोप करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे की २०१४ च्या निवडणूकीत भ्रष्टाचार, २०१९ मध्ये लाभार्थी आणि २०२४ च्या निवडणूकीत विकसित भारत हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. एका इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी पुढे म्हटलं आहे की ही निवडणूक महत्त्वाची असून देशाच्या अपेक्षेप्रमाणे विकसित भारताचे लक्ष्य गाठणार की नाही हे ठरवणारी आहे. विकासाची अपेक्षा असलेला मोठा वर्ग भाजपाबरोबर असल्याचंही त्यानी म्हटलं आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या कुशीनगर इथं बुद्ध पौर्णिमेनिमित्त शोभा यात्रा, पूजा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. गौतम बुद्धांच्या २ हजार ५६८ व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभा यात्रेत भारतासह जगभरातल्या अनेक देशातले भिक्षु आणि उपासक सहभागी झाले होते. म्यानमारचे भारतातले राजदूत यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अरुणाचल प्रदेशातल्या तवांग जिल्ह्यात नागरिकांच्या सोबतीनं भारतीय लष्करानं देखील बुद्ध पौर्णिमा साजरी केली. भारतीय सैन्य दलानं यानिमित्त आरोग्य शिबीर, व्हॉलिबॉल स्पर्धा आणि सहभोजन असे विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

भारताप्रमाणे परदेशातही बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी झाली. यानिमित्तानं सयुंक्त अरब अमिरात आणि दुबईत बौद्ध समुदायानं विशेष प्रार्थनासभा आयोजित केली होती.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात डोंबिवली इथं औद्योगिक वसाहतीतल्या रसायनांच्या कंपनीत स्फोट होऊन लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला तर किमान ५६ जण जखमी झाले आहेत. जखमींना वेगवेगळ्या रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, आपत्ती प्रतिसाद दल तसेच वैद्यकीय पथक दाखल झालं असून बचावकार्य वेगाने सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या दुर्घटनेला जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात सुगाव जवळ प्रवरा नदीत नाव उलटून झालेल्या दुर्घटनेत एनडीआरएफ च्या पथकातील ३ जवानांचा बुडून मृत्यू झाला. नावेतील आणखी एक स्थानिक आणि इतर दोघांचाही बुडून मृत्यू झाल्यानं या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या ६ झाली आहे. प्रवरा नदीच्या सुगावजवळ काल संध्याकाळी दोघेजण बुडाले होते. त्यातील एकाचा मृतदेह काल काढण्यात आला. आज सकाळी दुसऱ्या व्यक्तीच्या मृतदेहाचा शोध घेतांना ही दुर्घटना घडल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती निवारण दलानं दिली.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या बस्तर भागात आज सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत सात माओवादी मारले गेले. अबुझमाडच्या जंगलात माओवादी लपून बसल्याची माहिती गुप्तचर विभागाकडून मिळाली होती. सुरक्षा दलाची त्यांच्यासाठी शोधमोहिम सुरु होती तेव्हा माओवाद्यांनी दलाच्या जवानांवर हल्ला केला. त्यानंतर माओवादी आणि सुरक्षा दलांमध्ये नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवर चकमक झाली त्यात हे माओवादी ठार झाले. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रं आणि इतर सामग्री जप्त करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

देशातल्या युवकांना ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट याबाबत प्रशिक्षण देण्यासाठी नॅशनल सेंटर फॉर एक्सलन्स या केंद्राची स्थापना केली जाईल, असं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी म्हटलं आहे. ते आज चेन्नईत बातमीदारांशी बोलत होते. ३ लाख कोटीहून मोठ्या अशा चित्रपट निर्माण उदयोगासाठी आधुनिक तंत्रज्ञानानं पारंगत अशा युवकांची गरज असून चित्रपट उद्योगाची ही गरज केंद्र पूर्ण करेल, असं ते म्हणाले. जाजू यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयातल्या विविध विभागातल्या प्रमुखांशी चर्चा केली आणि मंत्रालयाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी योजना तयार करायला सांगितलं.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि करवीरचे आमदार पी. एन. पाटील यांच्या पार्थिवावार आज दुपारी कोल्हापूर जिल्ह्यात सडोली खालसा या त्यांच्या गावी शासकीय इतमामानं अंतिम संस्कार करण्यात आले. दिवंगत नेत्याला अखेरचा

निरोप देण्यासाठी यावेळी शोकाकुल कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. पी एन यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. १९७८ ते १९८५ या काळात जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर जिल्हा अध्यक्ष, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष अशा जबाबादाऱ्याही त्यांनी सांभाळल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

केरळमध्ये मुसळधार पाऊस सुरु असून हवामान विभागानं इर्नाकुलम आणि त्रिसुर जिल्हयात रेड तर इतर ८ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या काळात मासेमारी करण्यासाठी समुद्रात जाऊ नये अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसाने पुरसदृश्य स्थिती निर्माण होणार असून सखल आणि डोंगराळ भागात राहणाऱ्यांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

<><><><><>

मुंबई शेअर बाजारात आज सुरुवातीच्या घसरणीनंतर विक्रमी तेजी दिसून आली. औषधे, धातू वगळता इतर सर्व क्षेत्रातले समभाग तेजीत राहिले. बाजार उघडताना सुरु झालेल्या विक्रीमुळे निर्देशांक घसरला. पण त्यानंतर दिवसभर खरेदी सुरु राहिल्यानं सेन्सेक्सने ७५ हजारांचा टप्पा ओलांडला आणि जवळपास ७५ हजार ५००ची विक्रमी पातळी गाठली. पण त्यानंतर थोडी घसरण होऊन बाजार बंद होताना तो ७५ हजार ४१८ पूर्णांक चार शतांशवर बंद झाला. राष्ट्रीय

शेअर बाजाराचा निफ्टीही अशाच प्रकारची विक्रमी वाढ दाखवत २२ हजार ९६७ पूर्णांक ६५ शतांश वर बंद झाला.

**<><><><><>**

देशात रोजगार निर्मिती आणि निर्यात क्षेत्रात या वर्षीच्या मे महिन्यात विक्रमी वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या १८ वर्षांच्या तुलनेत प्रथमच ही वाढ नोंदवल्याचं एचएसबीसीच्या एका सर्वेक्षणात दिसून आलं आहे. एचएसबीसी फ्लॅश खरेदीच्या व्यवस्थापकीय निर्देशांकांनुसार, देशात  जुलै २०१० पासून खाजगी क्षेत्रातल्या उत्पादनात झालेल्या वाढीमुळं सेवा क्षेत्र मजबूत झालं असून त्यामुळे एकूण आर्थिक विस्ताराला गती मिळाल्याचंही या सर्वेक्षणात म्हटलं आहे. या बरोबरच सकल निर्यातीत विक्रमी वाढ झाल्याचं त्याचबरोबर खाजगी क्षेत्रातल्या रोजगार निर्मितीतही वाढ झाल्याचं या सर्वेक्षणातून स्पष्ट होत असल्याचं एचएसबीसीच्या मुख्य अर्थतज्ज्ञ प्रांजल भंडारी यांनी दिली आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मिरमधल्या वाढत्या तापमान वाढीमुळे हिमालयीन  क्षेत्रातल्या जंगलांमध्ये वणव्याची शक्यता असल्याचं जम्मू आणि काश्मीर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. नागरिकांनी या  आगीबाबतच्या घटनांची माहिती त्वरीत ११२ या क्रमांकावर  कळवावी, असं प्राधिकरणानं कळवलं आहे.

दरम्यान, जम्मू आणि काश्मीरच्या मैदानी भागात उष्णतेची लाट  पुढचे सहा दिवस सुरू राहील, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकातर्फे देण्यात येणारे वर्ष २०२४ चे स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार जाहीर झाले आहेत.  वीरचक्रप्राप्त कर्नल सचिन निंबाळकर यांना शौर्य पुरस्कार, आय.आय.टी.इंदूरचे संचालक डॉ. सुहास जोशी यांना विज्ञान पुरस्कार, सावरकर विचार प्रसारक विद्याधर नारगोळकर यांना स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतिचिन्ह पुरस्कार तर अभिनेता रणदीप हुडा यांना स्वातंत्र्यवीर सावरकर विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या रवीवारी बिहारचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल.

**<><><><><>**